# नि वे द न

मी या निवेदनाद्वारे जाहीर करतो की, " कोल्हापूरचे जहागिरदार हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याचा इतिहास (इ.स.१७१० ते १८१८) " हा प्रबंध माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. अरूण भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली मी स्वत: लिहिला असून सदर प्रबंध शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विषयातील एम.फिल. पदवी साठी विद्यापीठास सादर केला आहे.

(नामदेव शामराव शिरोळकर)
अभ्यासक

दिनांक : ३०-५-१९९६

## प्र मा ण प त्र

श्री. नामदेव शामराव शिरोळकर यांनी इतिहास विषयातील एम. फिल. पदवीसाठी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांजकडे सादर करावयाचा " कोल्हापूरचे जहागिरदार हिंमतबहादर चव्हाण घराण्याचा इतिहास (इ.स. १७१० ते १८१८) " हा प्रबंध माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केला आहे. श्री. शिरोळकर यांनी लिहिलेला प्रबंध त्यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली केलेल्या संशोधनावर आधारीत आहे.

(डॅा. अरूण भोसले)
प्रपाठक, इतिहास विभाग,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

मार्गदर्शक

दिनांक : ३०-५-१९९६

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यात जहागिरी वतनाची पद्धत नष्ट केली होती. तथापि औरंगजेबाच्या स्वारीच्या संकटाचा यशस्वी मुकाबला करण्यासाठी मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या काळात छत्रपती राजाराम महाराजांना या पद्धतीचे पुनरुज्जीवन करावे लागले. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाची समाप्ती झाल्यानंतर गादीचा खरा वारस कोण यावरून मराठ्यांच्यात यादवी माजली. मराठ्यांची सातारा व कोल्हापूर अशी दोन राज्ये निर्माण झाली. अंतर्गत दुहीमुळे मराठ्यांची सत्ता दुर्बल बनली. सातारा व कोल्हापूर या दोन्ही पक्षांनी आपले स्थान भक्कम करण्यासाठी सरंजामी जहागिरदार, सरदार यांचे सहाय्य घेतले. त्यामुळे जहागिरी वतनदारी पद्धत महाराष्ट्रात वाढण्यास प्रोत्साहन मिळाले. महाराणी ताराबाईने करवीर गादीची प्रतिष्ठापना, संरक्षण आणि संवर्धन करण्याच्या कामी अनेक सरदार, सरंजामी जहागिरदारांचे सहकार्य मिळवले. करवीर पक्षाची पाठराखण करणा-या सरदार घराण्यात हिंमतबहाद्दर चव्हाण घराणे प्रमुख होते. करवीर गादीची स्थापना, तिचे संरक्षण व करवीरकरांच्या राजकीय सत्तेची वृद्धी या अवस्थात हिंमतबहाद्दर चव्हाण घराणे करवीरकर छत्रपतींच्या सत्तेचा प्रमुख आधारस्तंभ होता.

मी एम.फिल. पदवी परीक्षेच्या प्रबंधासाठी " कोल्हापूरचे जहागिरदार हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याचा इतिहास इ.स. १७१० ते १८१८ " हा विषय निवडला. कारण माझे स्वतःचे गाव निगवे दुमाला हे हिंमतबहाद्दर चव्हाण यांच्या जहागिरीतीलच आहे. त्यामुळे लहानपणा पासून या चव्हाण घराण्यातील वीर पुरुषाविषयी अनेक गोष्टी मला ऐकावयास

SHIVAJI UNIVERSITY (LIBRARY) KOLHAPUR

मिळाल्या. या घराण्यातील पराक्रमी पुरूषांनी शहाजी राजे भोसले, शककर्ते शिवाजी महाराज, संभाजी महाराज, राजाराम महाराज, ताराबाई यांच्या दरबारामध्ये सरदारकीची कामे केली. संभाजी महाराजांच्या वधानंतर औरंगजेबावर तुळापूर मुक्कामी जो छापा टाकला त्यामध्ये चव्हाण घराण्यातील विठोजी चव्हाण यांचा समावेश होता. त्यावेळी त्यांना राजाराम महाराजांनी `हिंमतबहाद्दर` हा किताब दिला. अशा अनेक गोष्टी या चव्हाण घराण्याबद्दल मला ऐकावयास मिळाल्या. त्यामुळे या घराण्याचा इतिहास आपण अभ्यासावा अशी जिज्ञासा माझ्या मनात निर्माण झाली.

या घराण्यातील मुळ पुरूष कोण ? तो शहाजीराजांच्या चाकरीत कधी रूजू झाला त्यांनी काय पराक्रम केले ? त्यांनी कोणकोणा बरोबर लढाया केल्या ? त्यांना जहागिरी कधी कधी मिळाल्या ? माझे स्वत:चे गाव त्यांना जहागिर म्हणून कधी मिळाले ? यांचे इतर सताधिशांशी संबंध आले का ? साताराकर छत्रपती, शाहू, पेशवे, निजाम, करवीरकर छत्रपती यांच्याशी यांचे संबंध कसे होते ? या सर्व गोष्टी जाणून घेण्याची मला उत्सुकता लागली. म्हणून मी या चव्हाण घराण्यातील वीर पुरूषांच्या पराक्रमाचा, कामगिरीचा साधार शोध घेण्याचा प्रयत्न या छोटेखानी प्रबंधात करण्याचे योजले आहे.

मी या इतिहास प्रसिध्द घराण्याच्या इतिहासाचे संशोधन करण्याचे ठरवल्यानंतर प्रथम या चव्हाण घराण्यातील सध्याचे वंशज दिलीपसिंह प्रतापसिंह चव्हाण यांना भेटलो. त्यांनी आपल्या घराण्याविषयी थोडी फार माहिती मला दिली. त्याप्रमाणे या चव्हाणांचे सध्याचे दिवाण

आणि वा.वा. खरे लिखीत ` हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याचा इतिहास ` या ग्रंथाचे प्रकाशक ल.दि. दिवाण यांनीही मला थोडी फार माहिती पुरवली.

प्रस्तुत विषयावर सुप्रसिध्द इतिहास संशोधक वासुदेवशास्त्री खरे यांनी ` हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याचा इतिहास ` हा ग्रंथ लिहिला आहे. तथापि हा ग्रंथ खरे शास्त्रींच्या हयातीत तर प्रकाशित झाला नाहीच परंतु त्यांच्या निधनानंतर अनेक वर्षांनी म्हणजे इ.स. १९६७ साली प्रकाशित झाला. या ग्रंथाचा मला चव्हाण घराण्याच्या इतिहासाचा स्थूल आराखडा समजून घेण्यासाठी फार चांगला उपयोग झाला. वा.वा. खरे यांनी हा ग्रंथ लिहित असताना साने काव्यतिहास लेख संग्रह, साने पत्रे यादी, शाहू महाराजांची रोजनिशी, करवीर छत्रपती घराण्याच्या इतिहासाची साधने, वि.का. राजवाडे यांनी संपादित केलेली मराठयांच्या इतिहासाची साधने, त्यांनी स्वत: संपादित केलेले ऐतिहासिक लेखसंग्रह, सरदेसाई यांची मराठी रियासत, रधाजीराव चव्हाणांची रधाजीरावाची कैफियत अशी दर्जेदार संदर्भ साधने वापरली आहेत. तथापि या ग्रंथात काही संदर्भ चुकलेले माझ्या निदर्शनास आले. काही ठिकाणी संदर्भ म्हणून फक्त ग्रंथाचे नाव दिले आहे. उदाहरणार्थ इ.स. १७५१ मध्ये नानासाहेब पेशव्यांनी उदाजीरावांस डिगरज येथे सरंजाम दिला. या विधानाचा संदर्भ म्हणून ` मराठी रियासत मध्यभाग (१७०७-४०) ` इतकाच आहे. त्यावर पृष्ट क्रमांक दिलेला नाही. खरे शास्त्रींचा हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याच्या इतिहासावरचा हा ग्रंथ तयार झाल्यानंतर प्रस्तुत विषयाच्या अभ्यासाला उपयुक्त अशी अनेक संदर्भ साधने संशोधकानी अभ्यासकाना उपलब्ध करून दिली आहेत. शिवाजी

विद्यापीठाचे शिल्पकार, कुलगुरू व इतिहास संशोधक डॉ. आप्पासाहेब पवार यांनी `ताराबाईकालीन कागदपत्रे` ३ खंड व जिजाबाईकालीन कागदपत्रे १ खंड प्रकाशित केले. तसेच दुसरे एक व्यासंगी संशोधक श्री.स.मा. गर्गे यांनी `करवीर रियासतीची कागदपत्रे` खंड ४ प्रसिद्ध केले आहेत.

हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याच्या इतिहासाचा अभ्यास करताना व प्रस्तुत प्रबंध तयार करताना मी खरे शास्त्रींनी वापरलेली सर्व संदर्भ साधने सुद्धा बारकाईने अभ्यासली आहेत.

हिंमतबहाद्दर चव्हाण घराण्याच्या पूर्ववृत्तांताविषयी अत्यंत त्रोटक माहिती सापडते. उपलब्ध माहितीवरून हे घराणे उत्तरेतून आले असावे एवढाच अंदाज काढता येतो. या घराण्याच्या इतिहासाचे साधार विवेचन करणा-या या प्रबंधाची विभागणी चार प्रमुख प्रकरणात केली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये या घराण्याचा पूर्ववृत्तांत दिला आहे. त्यामध्ये या घराण्यातील पहिल्या पुरुषापासून इ.स. १६९६ पर्यन्त म्हणजे विठोजीराव चव्हाणांच्या मृत्यूपर्यन्त चव्हाण घराण्यातील कर्त्या पुरुषाच्या कामगिरीची माहिती दिली आहे. त्यानंतर दुस-या प्रकरणामध्ये उदाजीरावांच्या कामगिरीचा विस्तृत आढावा घेतला आहे. उदाजीराव चव्हाणांचा काल इ.स. १६९६ ते १७६२ पर्यन्तचा आहे. या ६५ वर्षांच्या कालखंडामध्ये उदाजीरावांनी अनेक सत्ताधीश व सरदार यांच्याशी संबंध जोडले व आपला सरंजाम टिकवून धरला. आपल्या आयुष्यातील बरीच वर्षे त्यांनी करवीर राज्याची सेवा करण्यामध्ये घालवली. याचा सविस्तर वृत्तांत दुस-या प्रकरणामध्ये दिला आहे. तिस-या प्रकरणामध्ये प्रीतिराव चव्हाणांच्या कामगिरीचा आढावा घेतला आहे. त्यांनी आपल्या सुमारे ४०

वर्षांच्या कालखंडामध्ये करवीरकर छत्रपतींची प्रामाणिकपणे सेवा केली. करवीर राज्याचे संरक्षण करण्यासाठी त्यांनी शत्रू पक्षाच्या महादजी शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन, धोंडोपंत गोखले, आप्पा देसाई इत्यादी नामांकित सेनानींशी सामना दिला. आयुष्याच्या शेवटपर्यन्त त्यांनी करवीर राज्यासाठी पराक्रम केले व आपल्या घराण्याच्या नावलौकिकात भर घातली. चौथ्या प्रकरणामध्ये या घराण्याला मिळालेल्या सरंजामाचा आढावा घेतला आहे. या घराण्यातील कोणत्या पुरुषाला कोणत्या कोणत्यावेळी किती सरंजाम मिळाला या घराण्यातील पुरुषांना वेळोवेळी मिळालेले सरंजाम त्यांना कोणत्या सत्ताधिशाकडून मिळाले. राजकारणातील चढउतारा बरोबर त्यांच्या सरंजामी जहागिरीच्या तक्शिमा कशा कमीअधिक होत गेल्या याचा वृतांत चौथ्या प्रकरणामध्ये दिला आहे. शेवटी दिलेल्या समारोप या प्रकरणात या अभ्यासाच्या प्रमुख निष्कर्षांची मांडणी केली आहे.

माझ्या अभ्यासाला उपयुक्त सर्व संदर्भ साधने मला शिवाजी विद्यापीठाचे बॅ. बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, राजाराम कॉलेजचे डॉ. बाळकृष्ण ग्रंथालय, कोल्हापूर रेकॉर्ड ऑफीस, कोल्हापूर न्यू पॅलेस रेकॉर्डस, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे इत्यादी ठिकाणी उपलब्ध झाली. वरील सर्व संस्थामधील ग्रंथपाल, अधीक्षक व इतर सेवक वर्ग यांच्या बहुमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

मी प्रस्तुत विषयाचा अभ्यास व या प्रबंधाचे लेखन शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे प्राध्यापक आणि माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. अरुण भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली केले आहे. त्यांनी मला

वेळोवेळी केलेले अचूक मार्गदर्शन, बहुमोल सहकार्य व त्यांचे मला सतत लाभलेले प्रोत्साहन याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे. त्याचप्रमाणे इतिहास संशोधक स.मा. गर्गे, डॉ. जयसिंग पवार, डॉ. वसंतराव कदम यांच्याबरोबर सुध्दा मी माझ्या अभ्यास विषयासंबंधी अनेकवेळा चर्चा केली. त्यांनी मला केलेल्या सहकार्य मार्गदर्शनाबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

(नामदेव शिरोळकर)

दिनांक :

स्थळ : कोल्हापूर

## अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | शीर्षक | | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| | प्रस्तावना | ... | |
| १ | हिंमतबहादर चव्हाण घराण्याचा पूर्वेतिहास | ... | १–22 |
| २ | उदाजीराव चव्हाण (१६९६-१७६२) | ... | 23–८५ |
| ३ | प्रीतिराव चव्हाण (१७७०-१८१०) | ... | ८६–123 |
| ४ | हिंमतबहादर चव्हाण घराण्याचा सरंजाम | ... | १२४–१३८ |
| ५ | समारोप | ... | १३९–१४९ |
| | संदर्भ ग्रंथ सूची | ... | १५०–१५९ |